# सल्ला

मागे वळुन पाहू नकोस
ओंजळीत तुझ्या फुलं आहेत
ठेच लागून पडू नकोस
फुले अजून कोवळी आहेत

फुलांच्या सुगंधामागे
येतात भुंगे
त्यांना तू घाबरू नकोस
मागे वळून पाहू नकोस
फुले अजून कोवळी आहेत

फुलांचे मोहक रंग
उठवतील मनात तरंग
त्याने तू बावरू नकोस
मागे वळून पाहू नकोस
फुले अजून कोवळी आहेत

वादळवारे येतात
साऱ्यांना सतावतात
त्यांना तूं भिऊ नकोस
मागे वळून पाहू नकोस
फुले अजून कोवळी आहेत.

– **पद्माकर चित्रे**

**('बोल अंतरीचे' या कवितासंग्रहातून)**